‘पूर्वा केमटेक’तर्फे आयोजन

# ‘मिलांज द्राक्ष महाराजा’ आणि ‘बनाना किंग’ स्पर्धेला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



‘मिलांज’ स्पर्धा परीक्षणप्रसंगी उपस्थित (उजवीकडून) श्री. संदीप सोनवणे, ‘पूर्वा केमटेक’चे कार्यकारी संचालक श्री. संजय पवार, डॉ. बी.बी. तथा श्री. अण्णासाहेब पवार, डॉ.श्री. भास्कर गायकवाड, श्री. संदीप वाघ, श्री. नितीन कराळे आदी.

**नाशिक:** येथील **‘पूर्वा केमटेक प्रा.लि’**तर्फे **‘मिलांज द्राक्ष महाराजा’** आणि **‘बनाना किंग’** ही प्रतिष्ठेची स्पर्धा ‘बसवंत गार्डन’, मुखेड रोड, पिंपळगाव बसवंत, ता. निफाड, जि. नाशिक येथे घेण्यात आली. यावर्षी ‘कोविड’ संक्रमणाच्या पार्श्वभूमीवर कोरोना नियमांचे पालन करून, केवळ मान्यवर परीक्षक आणि ‘पूर्वा केमटेक’चे कार्यकारी संचालक श्री. संजय पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत ही स्पर्धा उत्साहात पार पडली.

या स्पर्धेत नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार, पुणे, सांगली आदी जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनी आपल्या उत्कृष्ट द्राक्षांचे व केळी उत्पादनांचे नमुने पाठवून सहभाग नोंदवला. हिरवी द्राक्षे गटात जवळपास २५०, काळी द्राक्षे गटात १०० तर केळी गटात ९० उत्पादक सहभागी झाले.

हिरवी द्राक्षे गटातील मानाचा ‘मिलांज महाराजा’ हा किताब राजवर्धन मोहिते (वडनेर भैरव, ता. चांदवड) यांनी, तर काळी द्राक्षे गटातील ‘मिलांज महाराजा’ पुरस्कार शुभम दवंगे (खेडगाव, ता. दिंडोरी) यांनी मिळवला. ‘बनाना किंग’ पुरस्कार दिलीप महाजन (धानोरा, ता. चोपडा) यांच्या केळी उत्पादनाला देण्यात आला.

या व्यतिरिक्त हिरवी द्राक्षे गटात मंगेश पवार (वडनेर भैरव, ता. चांदवड) यांना प्रथम, सतीश जाधव (सोनी, ता. मिरज) यांना द्वितीय तर अनिल शेळके (मुखेड, ता. निफाड) यांच्या द्राक्ष उत्पादनाला तृतीय पुरस्कार देण्यात आला.

काळी द्राक्षे गटात विकास आथरे (उंबरखेड, ता. निफाड), श्रीकांत वायकर (गुंताळवाडी, ता. जुन्नर) व किरण भोज (मातेरेवाडी, ता. दिंडोरी) यांच्या उत्पादनांना

अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पुरस्कार देण्यात आले.

'बनाना किंग' गटात प्रथम- बापूसाहेब पाटील (तरडी, ता. शिरपूर), द्वितीय- जगदीश पाटील (पिंपळगाव कमानी, ता. जामनेर) तर अनिल पाटील (हिवरखेडा, ता. जामनेर)-तृतीय हे पुरस्कारांचे मानकरी ठरले.

स्पर्धेतील द्राक्ष व केळी उत्पादनांचे परीक्षण ज्येष्ठ कृषितज्ञ डॉ. बी.बी. तथा श्री. अण्णासाहेब पवार, 'ग्रीनझोन ॲग्रोकेम प्रा.लि.'चे तज्ञ संचालक तथा 'पूर्वा कृषिदूत' मासिकाचे संपादक डॉ.श्री. भास्कर गायकवाड आणि 'पूर्वा केमटेक' मधील वरिष्ठ अधिकारी श्री. दिलीप जगताप यांनी केले.

यावेळी 'बसवंत गार्डन' संकुलाचे प्रकल्प संचालक श्री. संदीप वाघ, 'पूर्वा केमटेक'चे विदर्भ विभाग विक्री व्यवस्थापक श्री. संदीप सोनवणे, मधमाशी उद्यान केंद्राचे प्रकल्प व्यवस्थापक श्री. नितीन कराळे आदी मान्यवर उपस्थित होते.



**पारितोषिकप्राप्त द्राक्ष आणि केळी उत्पादनांचे नमुने.**

**द्राक्षे हिरवी**

■ **मिलांज महाराजा**

**राजवर्धन नंदकिशोर मोहिते**
(मो.नं. ९९२१२१७७९२)
मु.पो. वडनेर भैरव, ता. चांदवड, जि. नाशिक
द्राक्ष : सोनाका

१) **मंगेश भाऊसाहेब पवार**
(मो.नं. ८२०८९९४७७५)
मु.पो. वडनेर भैरव, ता. चांदवड, जि. नाशिक
द्राक्ष : सोनाका

२) **सतीश पंढरीनाथ जाधव**
(मो.नं. ७०२८४१५११५)
मु.पो. सोनी, ता. मिरज, जि. सांगली

३) **अनिल सूर्यभान शेळके**
(मो.नं. ९६०४४९०४३५)
मु.पो. मुखेड, ता. निफाड, जि. नाशिक
द्राक्ष : एस.एस.एन.

**द्राक्षे काळी**

■ **मिलांज महाराजा**

**शुभम रमेश दवंगे**
(मो.नं. ९४०५२११९६१)
मु.पो. खेडगाव, ता. दिंडोरी, जि. नाशिक
द्राक्ष : जंबो सीडलेस

१) **विकास ज्ञानदेव आथरे**
(मो.नं. ९९२१४७७४४७)
मु.पो. उंबरखेड, ता. निफाड, जि. नाशिक
द्राक्ष : नानासाहेब पर्पल

२) **श्रीकांत गोरख वायकर**
(मो.नं. ९५४१४७७७११)
मु.पो. गुंताळवाडी, ता. जुन्नर, जि. पुणे
द्राक्ष : मामा पर्पल

३) **किरण निवृत्ती भोज**
(मो.नं. ९८२३३२०३२६)
मु.पो. मातेरेवाडी, ता. दिंडोरी, जि. नाशिक
द्राक्ष : जंबो

**केळी**

■ **बनाना किंग**

**दिलीप रघुनाथ महाजन**
(मो.नं. ९४०३५६५८३७)
मु.पो. धानोरा, ता. चोपडा, जि. जळगाव
द्राक्ष : राजनशाही

१) **बापूसाहेब शिवाजी पाटील**
(मो.नं. ९५४५०७८०१७)
मु. तरडी, ता. शिरपूर, जि. धुळे
द्राक्ष : जी-९

२) **जगदीश पाटील** (मो.नं. ९४२१४८७१४४)
मु. पिंपळगाव (कमानी), ता. जामनेर, जि. जळगाव

३) अनिल त्र्यंबक पाटील
मु. हिवरखेडा, ता. जामनेर, जि. जळगाव